(नोंदणी क्रमांक २९७७०)

(Reg.No.29770)

दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

आर-५, शेड, बीएआरसी, ट्रॉम्बे, मुंबई - ४०० ०८५.


The Bhabha Atomic Research Centre Employees' Co-Op. Credit Society Ltd., Mumbai

R-5 Shed, BARC, Trombay, Mumbai - 400 085.

E-mail : barc.society@gmail.com | Website : https://www.barcsociety.com

६५ वा वार्षिक अहवाल
२०२५-२६

65th Annual Report
2025-26



V8 HUMAN RESOURCE DEVELOPMENT, PUBLIC AWARENESS & OUTREACH, TECHNOLOGY TRANSFER AND SERVICES

V1 REACTORS PROGRAMME

V7 SPECIAL ACTIVITIES

V2 NUCLEAR FUEL CYCLE

V6 ADVANCED TECHNOLOGY DEVELOPMENT

V3 ACCELERATORS & LASER PROGRAMMES

V5 FRONTIERS IN BASIC RESEARCH

V4 SOCIETAL APPLICATIONS

Descriptions 'V1 to V8' and their respective titles showcase the 'Verticals' under which the Department of Atomic Energy (DAE) and its constituent units, including BARC organize their Nuclear Energy S&T activities. For more information on these 'Verticals', visit the DAE offical website.

THE BHABHA ATOMIC RESEARCH CENTRE
EMPLOYEES' CO-OP. CREDIT SOCIETY LTD., MUMBAI

Shri. Girish V. Shenai
Ex-Officio President

* संचालक मंडळ *
Board of Director

Shri. Avinash Tirpude
Ex-Officio Vice-President

माजी अध्यक्ष



श्री. हेमंत कोळी
Shri Hemant Koli
(डिसेंबर २०२२ ते जानेवारी २०२६)

अध्यक्ष



श्री. सी. आय. मेदार
Shri C. I. Medar

मानद सचिव



श्री. बाहुबली के. चौगुले
Shri B. K. Chougule

उपाध्यक्ष



श्री. विवेक भागडिया
Shri Vivek Bhagadia

खजिनदार



श्री. राजेश चौधरी
Shri Rajesh Chaudhari

संचालक



श्री. संतोष ढमढेरे
Shri Santosh Dhamdhere

संचालक



श्री. पांडुरंग बी. हांडे
Shri P. B. Hande

संचालक



श्री. एस.पी.एस. रॉय
Shri S. P. S. Roy

संचालक



श्री. शिवाजी हगवणे
Shri Shivaji Hagawane

संचालक



श्री. भागण्णा पी. टेळे
Shri B. P. Tele

संचालक



श्री. गजानन चकोले
Shri Gajanan Chakole

संचालक



श्री. अनिल कुटे
Shri Anil Kute

संचालिका



सौ. ऋतुजा आर. राणे
Mrs. Rutuja R. Rane

संचालिका



सौ. मनिषा डी. पाटील
Mrs. Manisha D. Patil

संचालक



डॉ. मिलिंद लंकेश्वर
Dr. Milind Lankeshwar

तज्ञ संचालक



श्री. अरुण र. कोळी
Shri Arun R. Koli

कार्यलक्षी संचालक



श्री. आर. के. मोरे (व्यवस्थापक)
Mr. R. K. More (Manager)

दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

(नोंदणी क्रमांक : २९७७०)

आर - ५ शेड, बीएआरसी, ट्रॉम्बे, मुंबई-४०० ०८५.

अधिसुचना

दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासदांना या अधिसूचनेद्वारे कळविण्यात येते की, आपल्या पतसंस्थेच्या अधिमंडळाची **६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २९ ऑगस्ट २०२६ रोजी २.०० वाजता डि.ए.ई. कन्व्हेंशन सेंटर, अणुशक्ती नगर** येथे खालील कामकाजासाठी आयोजित केलेली आहे.

सभेपुढील विषय:-

१. ६४ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. संचालक मंडळाने सादर केलेल्या दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीचा वार्षिक अहवाल, दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ अखेरचे वैधानिक लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारून त्यास मान्यता देणे.

३. सन २०२५ -२६ या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.

४. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.

५. वैधानिक लेखापरिक्षक यांच्या सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षांच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.

६. सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.

७. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणातील दोषांचे जाहीर वाचन करून त्या संबंधीच्या दोष दुरुस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे.

८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था पुणे यांनी जारी केलेल्या पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्थासाठी सुधारित आदर्श उपविधी (२०२६) स्वीकृती करणेबाबत.

९. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस (परिशिष्ट 'अ' प्रमाणे) मंजुरी देणे.

१०. ६४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेने नियुक्त केलेल्या उपसमितीने सादर केलेल्या अहवालाची नोंद घेणे.

११. अधिमंडळाच्या ६५ व्या वार्षिक सर्व साधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

१२. माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐन वेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

कृपया संस्थेच्या माननीय सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

सही/-

श्री बाहुबली कुमार चौगुले

मानद सचिव

संचालक मंडळाकरिता

दि बीएआरसी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

दिनांक : १४ ऑगस्ट २०२६

मुंबई ४०० ०८५.

टीप:

- सर्वसाधारण सभेच्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत आवश्यक गणसंख्या उपस्थिती आढळून आली नाही तर सभा तहकूब केली जाईल व अशी तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी दुपारी २.१५ वाजता गणपूर्तीशिवाय घेतली जाईल आणि त्यात घेतलेले निर्णय सर्व सभासदांना बंधनकारक राहतील.
- ६४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दि. २२.०२.२०२६ पासून संस्थेच्या वेबसाईटवर (https://www.barcsociety.com) उपलब्ध केले आहे, त्याचप्रमाणे सदरच्या सभेच्या इतिवृतांताच्या प्रती दि. १७.०८.२०२६ पासून संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध होतील आणि **65** व्या वार्षिक अहवालाच्या प्रती दि. १७.०८.२०२६ पासून संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध होतील.
- सभेच्या विषय पत्रिकेतील अनुषंगाने सभासदांना काही माहिती, सूचना किंवा प्रश्न सभेपूढे मांडावयाचे असतील तर ते त्यांनी लेखी स्वरूपात दिनांक २१ ऑगस्ट २०२६ पर्यंत सोसायटीच्या कार्यालयात दिले पाहिजेत. अशा विषयपत्रिकेतील विषयाच्या अनुषंगाने ज्या सभासदांनी लेखी स्वरूपात सूचना/प्रश्न दिले आहेत त्यास सभेच्या विषय पत्रिकेतील विषयाचे वेळी सभेमध्ये प्राधान्य देण्यात येईल.
- ज्या सभासदांनी मागील तीन वर्षांचा लाभांश घेतला नसेल तर तो त्यांनी सोसायटीच्या कार्यालयीन वेळेत येऊन दि. ३१ मार्च २०२७ पूर्वी घ्यावा अन्यथा असा लाभांश उपविधीतील तरतुदीनुसार वैधानिक गंगाजळी निधी खात्यात वर्ग करण्यात येईल.
- ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी देण्यात येणाऱ्या कुपन्स वितरणाबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

THE BARC EMPLOYEES'
CO-OPERATIVE CREDIT SOCIETY LIMITED, MUMBAI

(Reg. No. 29770)

R-5 Shed, BARC, Trombay, Mumbai – 400 085.

NOTIFICATION

Notice is hereby given that **65th Annual General Body Meeting** of The Bhabha Atomic Research Centre Employees' Co-operative Credit Society Ltd., Mumbai – 400 085 will be held at DAE Convention Centre, Anushakti Nagar on **Saturday, 29th August 2026, at 2.00 p.m.** to transact the following business:

AGENDA

1 To read & confirm the minutes of 64th Annual General Body Meeting.

2 To approve the Annual Report submitted by the Board of Directors for period 1st April 2025 to 31st March 2026, along with the Statutory Audited Balance Sheet and Profit & Loss Account as on 31st March 2026.

3 To approve the appropriation of profit for the Financial Year 2025-2026.

4 To ratify the excess expenditure over the approved budget for the year 2025-2026 and to approve the budget presented by the Board of Directors for the financial Year 2026-2027.

5 To take note of the Audit Report for the Financial Year 2025-2026 submitted by the Statutory Auditor.

6 To appoint Statutory Auditor for Financial Year 2026-2027.

7 To read about the audit remarks for the Financial Year 2024-2025 and to take note of the corresponding compliance report.

8 Regarding the adoption of the model Bye Laws (2026) for salaried Employees' co-operative Society issued by the Co-Operative Commissioner and Registrar, Pune.

9 To approve the Amendment to the Bye-Laws (As per annexure 'A') as proposed by the Board of Directors.

10 To take on record the report submitted by Sub-Committee appointed by the 64 th Annual General Body Meeting.

11 To condone absence of the members, who remain absent from the 65th Annual General Body Meeting.

12 To consider any other matter brought forward with the permission of the chair.

All the Honorable Members are requested to attend the meeting punctually .

Sd/-
Bahubali Kumar Chougule
Hon. Secretary
On behalf of Managing Committee
The BARC Employees' Co-op Credit Society Ltd.,

Mumbai.
Date : 14th August2026

Note:

- If it is found that there is no quorum of the meeting up to 2.00 p.m. the meeting shall be adjourned and this adjourned meeting shall be held on the same day at 2.15 p.m. in the same premises and the business on the agenda shall be transacted in the adjourned meeting irrespective of quorum.
- The minutes of the 64th Annual General Meeting have been made available on the Society's website (https://www.barcsociety.com) from 22.02.2026, copies of the minutes of the said meeting will also be available at the Society's office from 17.08.2026. Furthermore, copies of the 65th Annual Report will be available at the Society's office from 17.08.2026.
- If the members want to raise any information, suggestions or questions before the AGM in connection with subject given in Agenda of the meeting, they should submit it in written in Society office on or before 21st August, 2026. Those members who have submitted suggestions/questions in written form related with Agenda points will be given preference in the meeting at the time of that Agenda point.
- Members who have not yet collect their Dividend for the last three years, requested to collect the same on or before 31st March 2027. Otherwise, Dividend amount will be transferred to Statutory Reserve Fund Account as per approved Bye-laws of the Society.
- Regarding Coupon Distribution for the 65th Annual General Body Meeting will be intimated through a separate circular.

संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष मा. श्री. गिरीश शेणई सर यांचे अध्यक्षीय मनोगत

६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

दि. बीएआरसी एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

सप्रेम नमस्कार!

आदरणीय भागधारक सभासद बंधू-भगिनींनो,

आज आपल्या सर्वांच्या सहकार, विश्वास आणि एकात्मतेचे प्रतीक असलेल्या दि. बीएआरसी एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले आहे. या सभेस उपस्थित असलेल्या प्रत्येक सभासदाचे मी मन:पूर्वक स्वागत करतो आणि आपणा सर्वांना सस्नेह शुभेच्छा देतो.

या व्यासपीठावर उपस्थित असलेले संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष मा. श्री. अविनाश तिरपुडे, अध्यक्ष श्री. मेदार, उपाध्यक्ष श्री. विवेक भागडिया, मानद सचिव श्री. बाहुबली चौगुले, खजिनदार श्री. राजेश चौधरी, संचालक मंडळातील सर्व सहकारी, संस्थेचे अधिकारी, कर्मचारी तसेच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभागी झालेल्या सर्व सभासदांचे मी मन:पूर्वक स्वागत करतो.

बंधू-भगिनींनो,

"सहकारेण समृद्धिः भवतु" हे आपल्या संस्थेचे ब्रीदवाक्य केवळ शब्द नाहीत; ती आपल्या संस्थेची कार्यसंस्कृती, जीवनदृष्टी आणि सामूहिक प्रगतीची प्रेरणा आहे. सहकार म्हणजे एकमेकांच्या हातात हात घालून विश्वासाने पुढे जाण्याची शक्ती. सहकार म्हणजे प्रत्येक सभासदाच्या प्रगतीतून संस्थेची प्रगती आणि संस्थेच्या प्रगतीतून प्रत्येक सभासदाचे उज्ज्वल भविष्य.

सन १९६१ मध्ये काही दूरदृष्टी असलेल्या सहकाऱ्यांनी लावलेले हे सहकाराचे रोपटे आज आपल्या सर्वांच्या विश्वासामुळे एका विशाल, सशक्त आणि फलदायी वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. सहा दशकांहून अधिक काळाचा हा प्रवास सहज नव्हता. त्यामागे अनेक संचालक मंडळांचे दूरदर्शी नेतृत्व, कर्मचाऱ्यांची निष्ठा आणि हजारो सभासदांचे अखंड सहकार्य आहे.

आज आपल्या संस्थेने पगारदार सहकारी पतसंस्थांमध्ये अग्रगण्य स्थान प्राप्त केले आहे. सातत्याने 'अ' वर्गाचे लेखापरीक्षण मानांकन प्राप्त करणे ही संस्थेच्या आर्थिक शिस्तीची, सक्षम व्यवस्थापनाची आणि सभासदांनी ठेवलेल्या विश्वासाची जिवंत साक्ष आहे.

मला अत्यंत आनंद होत आहे की विद्यमान संचालक मंडळाने गेल्या वर्षभरात अनेक दूरगामी, सभासदहिताचे आणि पारदर्शक निर्णय घेतले. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, डिजिटल सेवा, आर्थिक शिस्त, सभासदांच्या हिताचे संरक्षण आणि सेवेतील गतिमानता या सर्व बाबींमध्ये संस्थेने उल्लेखनीय प्रगती केली आहे.

आज संस्थेचे संपूर्ण कामकाज अद्ययावत संगणक प्रणालीद्वारे पार पडत आहे. सर्व आर्थिक व्यवहार पारदर्शक पद्धतीने होत आहेत. डिजिटल सेवा अधिक सक्षम करण्यात आल्या आहेत. सभासदांना वेळेवर, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचा संस्थेचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

आपली पतसंस्था केवळ कर्ज देणारी संस्था नाही, तर सभासदांच्या आर्थिक सुरक्षिततेची विश्वासार्ह भागीदार आहे. सभासदांच्या गरजेनुसार आकर्षक ठेवी योजना, मोठ्या रकमेची कर्ज सुविधा, आर्थिक नियोजन आणि सुरक्षित गुंतवणूक या माध्यमातून संस्थेने आर्थिक सक्षमतेचा आदर्श निर्माण केला आहे.

सभासद बंधू-भगिनींनो,

संस्थेची आर्थिक प्रगती ही केवळ आकडेवारीवर मोजली जात नाही; ती सभासदांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या समाधानात, त्यांच्या वाढलेल्या विश्वासात आणि सेवेच्या गुणवत्तेत दिसून येते. म्हणूनच प्रत्येक निर्णय घेताना ''सभासद प्रथम'' हे तत्त्व आपल्या संचालक मंडळाने कायम जपले आहे.

मला खात्री आहे की, आजचे संचालक मंडळ संस्थेच्या उज्ज्वल परंपरेला साजेसे कार्य करीत राहील आणि आगामी काळातही अधिक नाविन्यपूर्ण, पारदर्शक आणि सभासदाभिमुख निर्णय घेईल. वार्षिक सर्वसाधारण सभा ही आपल्या सहकारी लोकशाहीची सर्वोच्च अभिव्यक्ती आहे. येथे प्रत्येक सभासदाचा आवाज महत्त्वाचा असतो. विचारभिन्नता असू शकते; परंतु उद्दिष्ट एकच असले पाहिजे-संस्थेची प्रगती आणि सभासदांचे कल्याण.

म्हणूनच आजची सभा परस्पर आदर, सभेची शिस्त, विधायक चर्चा आणि सकारात्मक वातावरणात पार पडावी, अशी मी आपण सर्वांना नम्र विनंती करतो. विषयपत्रिकेतील प्रत्येक विषयावर अभ्यासपूर्ण चर्चा व्हावी, सूचना मांडल्या जाव्यात आणि संस्थेच्या प्रगतीसाठी विधायक निर्णय घ्यावेत, हीच अपेक्षा आहे. आपल्या संस्थेची वाटचाल आता केवळ आजपुरती मर्यादित नाही. येणाऱ्या पिढ्यांसाठी अधिक सक्षम, आधुनिक, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि आर्थिकदृष्ट्या भक्कम सहकारी संस्था उभारण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांच्या खांद्यावर आहे.

आपला विश्वास हीच आमची प्रेरणा, आपले सहकार्य हीच आमची ताकद आणि सभासदांचे हित हेच आमचे सर्वोच्च ध्येय आहे.

या विश्वासासह, आजच्या सभेचे कामकाज विषयपत्रिकेनुसार सुरू करण्यासाठी मी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. मेदार यांना आणि मानद सचिव श्री. बाहुबली चौगुले यांना विनंती करतो.

आपल्या सर्वांचे पुन्हा एकदा मन:पूर्वक आभार.

धन्यवाद!

जय हिंद! जय महाराष्ट्र! जय सहकार!

आपला नम्र,

श्री. गिरीश शेणई
पदसिद्ध अध्यक्ष

६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

दि बीएआरसी एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

अध्यक्षीय मनोगत...

सप्रेम नमस्कार!

सन्माननीय भागधारक सभासद बंधू-भगिनींनो,

आज आपल्या संस्थेचा ६५वा वार्षिक अहवाल आपणसमोर मांडताना मला अतिशय आनंद होत आहे कारण गेल्या सहा दशकांहून अधिक काळ जपलेल्या विश्वासाचा, सहकाराच्या संस्कारांचा आणि सामूहिक प्रगतीच्या प्रवासाचा गौरव करण्याचा हा अत्यंत अभिमानाचा क्षण आहे.

सर्वप्रथम, या आर्थिक वर्षात आपल्यातून निघून गेलेले आपल्या संस्थेचे सभासद, तसेच देशसेवेसाठी योगदान देणारे शास्त्रज्ञ, डॉक्टर, परिचारिका, साहित्यिक, सुरक्षा दल व पोलीस दलातील जवान यांना संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त करतो.

बंधु भगिनींनो, सन १९६१ मध्ये काही दूरदृष्टी असलेल्या सहकारी विचारांच्या व्यक्तींनी एका छोट्याशा रोपट्याची लागवड केली. तेच रोपटे आज एका विशाल, सक्षम आणि विश्वासार्ह वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. हा प्रवास सहज झालेला नाही. त्यामागे हजारो सभासदांचा विश्वास, अनेक संचालक मंडळांचे दूरदर्शी नेतृत्व, कर्मचाऱ्यांची निष्ठा आणि सहकाराच्या मूल्यांवरील अखंड श्रद्धा आहे.

आपल्या संस्थेने केवळ आर्थिक प्रगती केली नाही, तर विश्वास, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सभासदाभिमुख सेवा या चार मजबूत स्तंभांवर स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. म्हणूनच सातत्याने 'अ' वर्गाचे लेखापरीक्षण मानांकन प्राप्त करणे ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. एक क्षण मागे वळून पाहूया...

ज्या संस्थेतून कधीकाळी सभासदांना रु.५० इतके कर्ज मिळत होते तीच संस्था आज सभासदांना रु.५० लाखापर्यंत कर्ज सुविधा उपलब्ध करून देत आहे. ही केवळ आकड्यांची वाढ नाही; हा सभासदांनी संस्थेवर ठेवलेल्या विश्वासाचा आणि सहकाराच्या सामर्थ्याचा जिवंत पुरावा आहे.

आपल्या संस्थेच्या प्रगतीमध्ये ठेवीदार आणि कर्जदार या दोन्ही घटकांचा सिंहाचा वाटा आहे. सभासदांनी ठेवलेला विश्वास आणि वेळोवेळी दिलेले सहकार्य यामुळेच आज आपण आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम, अधिक आधुनिक आणि अधिक सभासदाभिमुख संस्था म्हणून उभे आहोत.

आज सन २०२५–२६ या आर्थिक वर्षाचा अहवाल आपल्यासमोर सादर करताना आम्हाला समाधानापेक्षा अधिक जबाबदारीची जाणीव होत आहे कारण प्रत्येक यशानंतर अपेक्षा वाढतात आणि त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी संचालक मंडळ अधिक समर्पितपणे कार्य करत आहे.

आपल्या सभासदांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत, प्रशासन अधिक पारदर्शक, निर्णयप्रक्रिया अधिक गतिमान आणि सेवा अधिक सुलभ करण्यासाठी वर्षभर सातत्याने प्रयत्न करण्यात आले. या प्रयत्नांना सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि त्याचे फलित म्हणून अनेक ऐतिहासिक निर्णय व लोकहितकारी उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आले. आज त्या सर्व ठळक कामगिरीचा लेखाजोखा अत्यंत अभिमानाने आपल्या समोर मांडत आहे.

सन २०२५–२६ मधील ठळक कामगिरी

सभासद बंधू-भगिनींनो,

आपल्या संस्थेची प्रत्येक यशोगाथा ही संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या सभासदांच्या विश्वास, सहकार्य आणि सहभागातून साकार झाली आहे. आपण दिलेल्या पाठबळामुळेच सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात

संस्थेने अनेक ऐतिहासिक, सभासदहिताचे आणि दूरगामी निर्णय यशस्वीपणे राबविले. त्यापैकी काही महत्त्वपूर्ण कामगिरी पुढीलप्रमाणे आहे :-

१. मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या मान्यतेने गंगाजळीची तरतूद २५% ऐवजी १०% करण्यास मंजुरी मिळविण्यात यश आले.

२. आदरणीय डॉ. विक्रम साराभाई भवन यांच्या १०६ व्या जयंतीचे औचित्य साधून विक्रम साराभाई भवन येथे 'विस्तारित सेवा कक्ष' सुरू करण्यात आला.

३. सभासदांच्या हिताचा विचार करून 'विक्रम कर्ज संरक्षण निधी योजनेचा' व्याजदर ०.५% वरुन ०.३% करण्यात आला. त्यामुळे सभाससदांच्या कर्जखात्यात थेट बचत झाली.

४. ६४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर झालेल्या नियमावलीनुसार संस्थेच्या रु.११२४.४७ खेळत्या भांडवलाच्या सहस्त्रपूर्तीचे औचित्य साधून दीपावलीनिमित्त प्रत्येक सभासदाच्या खात्यात रु. १०००/- प्रोत्साहनपर रक्कम जमा करण्यात आली.

५. सभासदांच्या वाढत्या सहभागाचा विचार करून संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. ५० कोटींवरून रु. १०० कोटी करण्यात आले. तसेच दि. १ एप्रिल २०२६ पासून प्रत्येक सभासदाची वैयक्तिक भागधारण मर्यादा रु. १५,००० वरून रु. ३०,००० करण्यात आली. या निर्णयामुळे संस्थेची आर्थिक पायाभरणी अधिक भक्कम झाली आहे.

६. सभासदांचा टीडीएस वाचावा यासाठी 'पार्शियल विथड्रॉल' सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

७. गेल्यावर्षी 'अर्थवृद्धी' ही नाविन्यपूर्ण आवर्त ठेव योजना आणली ज्यात या वर्षी रुपये ६ कोटीने वाढ झाली आहे.

८. विद्यमान संचालक मंडळाने कारभार हाती घेतला तेव्हा सन 2022-23 मध्ये संस्थेच्या संड्री खात्यात असलेली प्रलंबित देय रक्कम आस्थापनेच्या सहकार्याने संबंधित सभासदांशी संपर्क साधून व माहिती घेऊन त्यांच्या बँक खात्यात रक्कम वर्ग करण्यात आली.

९. आयकर कायद्याच्या तरतुदीनुसार ठेवींवरील व्याजाचा तिमाही पद्धतीने विचार करून टीडीएस कपात करण्याची व्यवस्था करण्यात आली.

१०. सभासदांवर एकरकमी आर्थिक भार पडू नये म्हणून संस्थेने भरलेला टीडीएस त्यांच्या देय व्याजातून समायोजित करण्यात आला.

११. संस्थेच्या आवारात राहणाऱ्या सभासदांचा घरभाडे भत्ता वेतनात समाविष्ट करून त्यांच्या कर्जपात्रतेत वाढ करण्यात आली.

१२. दीर्घकालीन कर्जावरील दैनंदिन व्याज आकारणी लागू करून सभासदांची आर्थिक बचत सुनिश्चित करण्यात आली.

१३. संगणकीय पगार कपात प्रणालीतील त्रुटी दूर करून ती अधिक स्थिर, अचूक आणि कार्यक्षम करण्यात आली.

१४. मुदत ठेवींच्या स्वयंचलित पुनर्गुंतवणुकीची (Auto Renewal) सुविधा सुरू करून सभासदांचे आर्थिक नुकसान टाळण्यात आले.

१५. बीएआरसी बाहेरील तारापूर, ब्रिट वाशी, डीएई मुंबई, आर.एम.सी. परेल आदी ठिकाणच्या सभासदांनाही तेथे दर आठवड्याला संस्थेचा कर्मचारी पाठवून सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

१६. सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांना आवश्यक नो-ड्यूज प्रमाणपत्र ई-मेलद्वारे त्वरित उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू करण्यात आली.

१७. सभासदांच्या प्रत्येक आर्थिक व्यवहाराची माहिती एसएमएस अलर्ट द्वारे तत्काळ उपलब्ध करून देण्यात आली.

१८. संस्थेच्या संकेतस्थळावर सभासदांना त्यांच्या खात्याची माहिती लाईव्ह स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली.

१९. ठेवी, कर्ज, अंतिम देयके, विद्यार्थी गुणगौरव यांसह विविध अर्ज ऑनलाईन उपलब्ध करून डिजिटल सेवांना चालना देण्यात आली.

२०. कार्यालयात सीसीटीव्ही, वॉटर कुलर आणि वॉटर प्युरिफायर बसवून कार्यालयीन सुविधा अधिक सक्षम करण्यात आल्या.

२१. कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कार्याचा गौरव करण्यासाठी 'एम्प्लॉई ऑफ द इयर' पुरस्कार सुरू ठेवण्यात आला.

सभासद बंधू-भगिनींनो,

यश हा प्रवासाचा शेवट नसतो; तो नव्या जबाबदाऱ्यांची सुरुवात असतो. आजपर्यंत मिळालेल्या यशावर समाधान न मानता भविष्यातही संस्थेला अधिक सक्षम, आधुनिक, तंत्रज्ञानस्नेही आणि सभासदाभिमुख बनविण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध आहे.

आगामी काळात आम्ही पुढील बाबींवर विशेष भर देणार आहोत—

- संस्थेतील रिक्त व्यवस्थापक पद भरती होण्याच्या मार्गावर आहे. प्रशासकिय बाबींची पुर्तता झाल्यावर हे पद भरण्यात येईल.
- गो कॅशलेस इंडिया प्रा. लि. यांच्याकडून येणे असलेल्या रकमेची प्रभावी पाठपुरावा करून वसुली करणे.
- करिअर जंक्शन-१ प्लेसमेंट कन्सल्टन्सी प्रकरणात स्थापन केलेल्या उपसमितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने आवश्यक कायदेशीर कार्यवाही करणे.
- सेवानिवृत्त तसेच इतर सभासदांचा संपर्क साधून उर्वरित लाभांशाचे वितरण पूर्ण करणे.
- संस्थेच्या सर्व सेवा अधिकाधिक डिजिटल, पारदर्शक आणि वेळेची बचत करणाऱ्या बनविणे.
- प्रत्येक निर्णयात सभासद हित, आर्थिक शिस्त आणि पारदर्शकता यांना सर्वोच्च प्राधान्य देणे.

आमचा दृढ विश्वास आहे की, ''सशक्त सभासद म्हणजे सशक्त संस्था आणि सशक्त संस्था म्हणजे सक्षम सहकार.''

सभासद बंधू-भगिनींनो,

सहकार ही केवळ आर्थिक व्यवस्था नाही; ती विश्वासाची परंपरा, परस्पर सहकार्याची भावना आणि सामूहिक प्रगतीची जीवनपद्धती आहे. आपल्या संस्थेने गेली सहा दशके याच मूल्यांना जपले आहे. या यशामागे हजारो सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाची दूरदृष्टी, कर्मचाऱ्यांची निष्ठा आणि सहकारावरील अखंड श्रद्धा आहे. आज आपण सर्वांनी मिळून उभारलेला हा सहकाराचा वटवृक्ष भविष्यात आणखी विस्तारत राहील, याचा आम्हाला दृढ विश्वास आहे.

मी सर्व सभासदांना एकच आवाहन करतो, आपला विश्वास, आपला सहभाग आणि आपले सहकार्य हेच संस्थेचे खरे भांडवल आहे. आपण आपण सर्वांनी एकदिलाने, एकविचाराने आणि एकसंघपणे संस्थेच्या प्रगतीची ही वाटचाल अधिक वेगवान करूया.

आपल्या संचालक मंडळाच्या वतीने आणि संपूर्ण संस्थेच्या वतीने आपण सर्व सभासदांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. परमेश्वर आपण सर्वांना उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी, यश आणि दीर्घायुष्य देवो, हीच प्रार्थना.

धन्यवाद!

जय हिंद! जय महाराष्ट्र!जय सहकार!

आपला नम्र,

श्री. मेदार सी. आय.
अध्यक्ष
संचालक मंडळाच्या वतीने

Address by the Ex-Officio President Shri Girish Shenai
65th Annual General Meeting of
The BARC Employees' Co-operative Credit Society Ltd.

Warm Greetings!

Respected Shareholder Members, Brothers and Sisters,

It is my privilege and honour to be present at the 65th Annual General Meeting of BARC Employees Co-operative Credit Society Ltd., an institution that symbolizes our collective cooperation, trust, and unity. I extend my heartfelt welcome to each and every member present here today and convey my warm greetings and best wishes to all of you.

I also take this opportunity to warmly welcome the dignitaries present on the dais: Ex-Officio Vice President Shri Avinash Tirpude, Chairman Shri Medar, Vice Chairman Shri Vivek Bhagdia, Hon. Secretary Shri Bahubali Chougule, Treasurer Shri Rajesh Chaudhari, all members of the Board of Directors, the Society's officers and employees, as well as all members who have participated either in person or indirectly.

Dear Brothers and Sisters,

"Sahakarena Samruddhih Bhavatu" (May Prosperity Be Achieved Through Cooperation) is not merely the motto of our Society; it represents our work culture, our philosophy of life, and our inspiration for collective progress. Cooperation is the strength that enables us to move forward together with mutual trust and confidence. It signifies the Society's progress through the advancement of every member, and in turn, the bright future of every member through the Society's growth.

The seed of cooperation planted in 1961 by a few visionary colleagues has, through the trust and support of all our members, grown into a strong, flourishing, and magnificent banyan tree. This journey of more than six decades has not been an easy one. It is the result of the visionary leadership of successive Boards of Directors, the unwavering dedication of our employees, and the continuous support of thousands of members.

Today, our Society has earned a distinguished position among salaried employees' co-operative credit societies. Our consistent achievement of the 'A' Class Audit Rating stands as a testament to our financial discipline, efficient management, and the confidence reposed in us by our members.

I am delighted to note that during the past year, the present Board of Directors has taken several far-reaching, member-centric, and transparent decisions. The Society has made remarkable progress in adopting modern technology, strengthening digital services, maintaining financial discipline, safeguarding members' interests, and enhancing the efficiency of its services.

Today, the Society's entire operations are carried out through an advanced computerized system. All financial transactions are conducted transparently. Our digital services have been significantly strengthened, and continuous efforts are being made to provide members with timely, convenient, and high-quality services. These achievements are indeed commendable.

Our Credit Society is not merely an institution that provides loans; it is a trusted partner in ensuring the financial security of its members. Through attractive deposit schemes, higher loan facilities, financial planning assistance, and secure investment opportunities tailored to members' needs, the Society has established an exemplary model of financial empowerment.

Dear Members,

The financial progress of an institution cannot be measured solely by numbers. It is reflected in the satisfaction visible on the faces of our members, in the increasing trust they place in the Society, and in the quality of services they receive. It is for this reason that our Board of Directors has consistently upheld the principle of "Members First" while making every decision.

I am confident that the present Board of Directors will continue to uphold the Society's glorious traditions and, in the years ahead, make even more innovative, transparent, and member-oriented decisions. The Annual General Meeting represents the highest expression of our co-operative democracy, where every member's voice holds significance. Differences of opinion may exist, but our objective must remain the same—the progress of the Society and the welfare of its members.

Therefore, I humbly request all members to ensure that today's meeting is conducted in an atmosphere of mutual respect, discipline, constructive discussion, and positivity. I sincerely hope that every item on the agenda will be deliberated thoughtfully, valuable suggestions will be placed before the House, and constructive decisions will be taken for the continued progress of our Society.

Our journey is no longer confined to the present. The responsibility now rests upon all of us to build an even stronger, more modern, technology-driven, and financially robust co-operative institution for future generations.

Your trust is our inspiration. Your cooperation is our strength.

The welfare of our members is our highest priority.

With these words, I request Chairman Shri Medar and Hon. Secretary Shri Bahubali Chougule to commence the proceedings of today's Annual General Meeting as per the agenda.

Once again, I express my heartfelt gratitude to all of you for your presence, support, and continued trust.

Thank you.

Jai Hind! Jai Maharashtra! Jai Sahakar!

Mr. Girish Shenai
President

65th Annual General Meeting

The BARC Employees' Co-operative Credit Society Ltd.

Chairman's Address

Mr. Medar C. I.

Warm Greetings!

Respected Shareholders, Esteemed Members, Brothers and Sisters,

It gives me immense pleasure to present before you the 65th Annual Report of our Society. This is a proud moment to celebrate more than six decades of trust, the enduring values of cooperation, and our collective journey of progress.

At the outset, on behalf of the Society, I pay heartfelt tribute to our members who passed away during the financial year, as well as to the scientists, doctors, nurses, litterateurs, personnel of the armed forces, security forces, and police who dedicated their lives in service to the nation. We also extend our deepest condolences to their families.

Dear Members,

In 1961, a few visionary individuals with a strong belief in the cooperative movement planted the seed of this institution. Today, that small sapling has grown into a large, strong, and trusted banyan tree. This remarkable journey has not been easy. It is the result of the unwavering trust of thousands of members, the visionary leadership of successive Boards of Directors, the dedication of our employees, and our steadfast commitment to cooperative values.

Our Society has achieved not only financial growth but has also built its distinct identity on four strong pillars—trust, transparency, accountability, and member-centric service. It is a matter of great pride that we have consistently earned the 'A' Class Audit Rating. Let us take a moment to reflect on our journey.

There was a time when the Society could provide loans of only ₹50 to its members. Today, we are proud to extend loan facilities of up to ₹50 Lakhd. This is not merely a growth in numbers; it is a living testimony to the confidence our members have placed in the Society and the strength of the cooperative movement.

The progress of our Society has been made possible through the significant contributions of both our depositors and borrowers. Their trust and continued support have enabled us to emerge as a financially stronger, technologically advanced, and more member-focused institution.

As we present the report for the financial year 2025–26, we feel a greater sense of responsibility than satisfaction. Every achievement raises expectations, and our Board of Directors remains fully committed to meeting those expectations with dedication.

Throughout the year, we consistently worked to place members' interests at the highest priority by making our administration more transparent, decision-making faster, and services more accessible. The overwhelming support received from our members enabled us to successfully implement several historic decisions and member-friendly initiatives. I am pleased to present before you the highlights of these achievements.

Major Achievements During FY 2025–26

Dear Members,

Every success of our Society has been made possible through the combined efforts of the Board of Directors, our employees, and above all, the trust, cooperation, and participation of our members. With your continued support, we successfully implemented several historic and far-reaching initiatives during the financial year 2025–26. Some of the significant achievements are as follows:

1. With the approval of the Deputy Registrar of Cooperative Societies, Pune, we successfully obtained permission to reduce the statutory reserve requirement from 25% to 10%.
2. On the occasion of the 106th Birth Anniversary of Dr. Vikram Sarabhai, an Extension Service Centre was inaugurated at the Vikram Sarabhai Bhavan.
3. Keeping members' welfare in mind, the interest rate under the (VKSY) Vikram Loan Protection Fund Scheme was reduced from 0.5% to 0.3%.
4. In accordance with the 'regulations regarding utilisation of available funds' passed at the 64th Annual General Meeting, and to commemorate the Society crossing ₹1,124.47 crores in working capital, an incentive amount of ₹1,000 was credited to every member's account during Diwali.
5. Considering the growing participation of members, the Society's authorized share capital was increased from ₹50 crores to ₹100 crores. Furthermore, effective 1 April 2026, the individual shareholding limit for each member was increased from ₹15,000 to ₹30,000, thereby strengthening the Society's financial foundation.
6. A Partial Withdrawal Facility was introduced to help members reduce their TDS liability.
7. The innovative recurring deposit scheme "Arthavruddhi", launched last year, witnessed an increase of ₹6 crore during this financial year.
8. When the present Board assumed office, outstanding amounts lying in the Society's Sundry Accounts for FY 2022–23 were identified. With the cooperation of the BARC establishment and after contacting the concerned members, these amounts were transferred to their bank accounts.
9. A quarterly system for calculating and deducting TDS on interest income, as per the Income Tax Act, was implemented.
10. To avoid imposing a lump-sum financial burden on members, the TDS paid by the Society was adjusted against the interest payable to them.
11. The House Rent Allowance (HRA) of members residing within the BARC presmises was included in salary calculations, thereby enhancing their loan eligibility.
12. Daily interest calculation was introduced for long-term loans, ensuring greater savings for members.
13. Deficiencies in the computerized salary deduction system were rectified, making it more stable, accurate, and efficient.
14. An Auto Renewal Facility for fixed deposits was introduced, preventing financial loss due to maturity oversight.
15. Members stationed outside BARC premises —at Tarapur, BRIT Vashi, DAE Mumbai, RMC Parel are provided services through weekly visits by Society staff.
16. A facility was introduced to provide Dues/No Dues Certificates promptly via email to retiring members' establishment.
17. SMS alerts were introduced to provide members with instant information regarding every financial transaction.
18. Members were provided live access to their account information through the Society's website.
19. Various applications—including deposits, loans, final settlements, student merit awards, and others—were made available online, promoting digital services.
20. Office infrastructure was strengthened with the installation of CCTV cameras, water coolers, and water purifiers.
21. The "Employee of the Year" Award was continued to recognize outstanding employee performance.

Future Priorities

Dear Members,

Success is never the end of the journey; it marks the beginning of new responsibilities. While we take pride in our achievements, the Board of Directors remains committed to making the Society stronger, more modern, technologically advanced, and increasingly member-centric.

In the coming years, we will focus on:

- The vacant Manager's post in the Society is in process of being filled. The appointment will be made after the completion of the necessary administrative formalities.
- Effectively pursuing the recovery of outstanding dues from Go Cashless India Pvt. Ltd.
- Initiating appropriate legal action, subject to the approval of the General Body, after receiving the report of the sub-committee constituted to examine the Career Junction-1 Placement Consultancy matter.
- Contacting retired and other members to complete the distribution of pending dividends.
- Making all Society services increasingly digital, transparent, and time-efficient.
- Ensuring that every decision continues to prioritize members' interests, financial discipline, and transparency.

We firmly believe that:

"Strong Members Build a Strong Society, and a Strong Society Strengthens the Cooperative Movement."

Dear Members,

Cooperation is not merely an economic system; it is a tradition of trust, a spirit of mutual support, and a way of collective progress. For over six decades, our Society has remained committed to these ideals. Our success has been built upon the trust of thousands of members, the foresight of successive Boards of Directors, the dedication of our employees, and our unwavering faith in the cooperative movement.

We are confident that the tree of cooperation that we have collectively nurtured will continue to grow and flourish in the years ahead.

I make one sincere appeal to all our members: your trust, your participation, and your continued support are the Society's greatest assets. Let us move forward together—with unity, shared purpose, and collective determination—to accelerate the Society's progress.

On behalf of the Board of Directors and the entire Society, I extend my heartfelt gratitude to every member. I pray that the Almighty blesses all of you with good health, happiness, prosperity, success, and a long life.

Thank you.

Jai Hind! Jai Maharashtra! Jai Sahakar!

Mr. Medar C.I.
Chairman
On behalf of Board of Directors

सन्माननीय सभासद,

दि बीएआरसी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित मुंबई च्या अधिमंडळाच्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संचालक मंडळाच्यावतीने मी आपले सर्वांचे हार्दिक स्वागत करतो. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीचा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक तसेच सन २०२६-२०२७ चे अंदाजपत्रक सादर करताना अतिशय आनंद होत आहे. आपली "दि बीएआरसी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित मुंबई" हि पगारदार पतसंस्थेतील एक अग्रगण्य पतसंस्था असून आपल्या सर्वांच्या सहकार्याने नेत्रदीपक प्रगती केलेली आहे.

सन २०२५-२०२६ या अहवाल वर्षात एकूण ढोबळ नफा रु. १७,७२,९७,३६७/- इतका झाला असून यातून रक्कम रु. १,६४,५६,८०९/- इतकी तरतूद केल्यामुळे रुपये १६,०८,४०,५५८/- इतका निव्वळ नफा झाला असून तो आम्ही आपल्या मान्यतेसाठी सादर करीत आहोत.

१. **नफा विभाजन :** संस्थेने स्वत:च्या निधींचा व ठेवीद्वारे उपलब्ध झालेल्या रकमेचा काटेकोरपणे वापर करून अधिकाधिक सभासदांना पतपुरवठा करून समाधानकारक नफा मिळवला आहे.
संस्थेस आर्थिक वर्षात रु. १७,७२,९७,३६७/- ढोबळ नफा झाला असून महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम ४९-अ अन्वये वैधानिक तरतुदी वजा जाता रु. १६,०८,४०,५५८/- इतका निव्वळ नफा झाला आहे. गतवर्षीचा शिल्लक नफा रु. १५,७६०/- मिळवून विभागणीसाठी एकूण नफा रु. १६,०८,५६,३१८/- उपलब्ध आहे.
आपली संस्था लाभांश वाटप करताना सभासदांचे हित जोपासण्याबरोबरच संस्थेचे भांडवल निधी (स्वनिधी) वाढविण्याचा समतोल राखत आहे. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी सभासदांना गतवर्षीप्रमाणे १५% लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

नफा रु. १६,०८,४०,५५८/- वर १०% प्रमाणे वैधानिक राखीव निधी	रु.	१,६०,८४,०५६.००
भाग रकमेवर १५% प्रमाणे लाभांश	रु.	३,९९,९८,९५७.००
आकस्मिकता राखीव निधी	रु.	२,००,००,०००.००
निवडणूक खर्च तरतूद	रु.	१०,००,०००.००
सभासद कल्याण निधी	रु.	३,००,००,०००.००
वैधानिक तरलता निधी	रु.	५,००,००,०००.००
विक्रम कर्ज संरक्षण निधी योजना	रु.	१०,००,०००.००
सभासद भविष्य सहाय्य निधी बोनस	रु.	१४,९०,९६८.००
मृत्यू सहाय्य निधी	रु.	५,५०,०००.००
सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण निधी	रु.	५,००,०००.००
कर्मचारी कल्याण निधी	रु.	१,७५,०००.००
शिल्लक नफा पुढील वर्षासाठी वर्ग केला	रु.	५७,३३७.००
एकूण	**रु.**	**१६,०८,५६,३१८.००**

२. **सभा :**

(अ) **वार्षिक सर्वसाधारण सभा :** संस्थेची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी DAE कन्व्हेन्शन सेंटर येथे संपन्न झाली. ६४ व्या वार्षीक सर्वसाधारण सभेस ३२९५ सभासदांनी उपस्थिती

दर्शिविली. सभेस उपस्थित असलेल्या प्रत्येक सभासदांस रु. १००×३२९५ अशी म्हणजेच रु. २५ ×४ ×३२९५ = ३,२९,५००/- इतकी कुपन्स वितरीत करण्यात आली.
प्रत्यक्षात कॅन्टीन व विभागीय दुकानामार्फत रु. २५×१०९४८ इतकी कुपन्स देयकासाठी प्राप्त झाली त्यानुसार रु. २,७३,७००/- इतकी रक्कम अदा करण्यात आली.

(ब) **संचालक मंडळाच्या सभा :** सभासद, ठेवीदार व कर्जदार यांचे हित सतत नजरे समोर ठेवून त्यांना तत्पर सेवा आणि अधिकाधिक सुविधा देण्याचा प्रयत्न संचालक मंडळ करीत असून त्या दृष्टीने निरंतर प्रयत्न चालू आहेत. सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षात कार्यकारी संचालक मंडळाच्या मासिक सभा १२ व विशेष सभा २१ अशा एकूण ३३ सभा झाल्या आहेत.

त्याचप्रमाणे पतसंस्थेच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी संचालक मंडळाने यशस्वीपणे प्रयत्न केले आहेत. प्रत्येक सभांमध्ये सर्व संचालकांनी उपस्थित राहून पतसंस्थेच्या कामकाजामध्ये दक्षतापूर्वक उत्स्फूर्त सहभाग घेतला.

३. लाभांश व वर्गणीवरील व्याज :

अ) भाग रकमेवरील लाभांश : अहवाल वर्षात संचालक मंडळ भाग रक्कमेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ६७ नुसार कमाल १५% प्रमाणे लाभांश जाहीर करीत आहे. लाभांशाची एकूण रक्कम रु. ३,९९,९८,९५७/- सभासदांनी धारण केलेल्या त्यांच्या भाग रकमेप्रमाणे ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर लाभांशाची रक्कम वितरीत करण्यात येईल.

ब) सभासद वर्गणीवरील व्याज : अहवाल वर्षात सभासदांच्या मासिक सभासद वर्गणीवरील सरासरी शिल्लक रकमेवर १०% प्रमाणे व्याजाची तरतूद करण्यात आली असून सभासदांना सर्वसाधारणे सभेपुर्वी सभासद वर्गणीवरील व्याजाची रक्कम वितरीत करण्यात येईल.

४. अंदाजपत्रक :

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास संचालक मंडळाने मान्यता देण्यासाठी शिफारस केली आहे. सदर अंदाजपत्रक अहवालामध्ये समाविष्ट केले आहे, तथापि सदर अंदाजपत्रकास मंजुरी मिळावी.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली होती. त्यामध्ये अपेक्षित उत्पन्न रु. १०५.२५ कोटी दर्शविण्यात आले होते व अपेक्षित खर्च रु. ८८.१३ कोटी दर्शविण्यात आले होते, प्रत्यक्षात रु. १०७.२१ कोटी इतके उत्पन्न मिळाले यामधुन एकूण रु. ९१.१२ कोटी इतका खर्च झाला आहे. गतवर्षी अंदाजित नफा रु. १७.१२ कोटी इतका दर्शविण्यात आला होता परंतु अहवाल साली ढोबळ नफा रु. १७.७३ कोटी इतका झाला. यामधुन वैधानिक तरतूदी केल्यानंतर निव्वळ नफा रु. १६.०८ कोटी इतका प्राप्त झाला आहे.

५. आर्थिक आढावा :

आर्थिक वर्षात संस्थेने गतवर्षीच्या वार्षिक उलाढालीत रु. १३४.६७ कोटीने वाढ करून एकूण वार्षिक उलाढाल रु. १२५९.१५ कोटीचा टप्पा ओलांडून गौरवास्पद कामगिरी केली आहे. एकूण वार्षिक उलाढालीत ११.९७% ने वाढ झाली आहे.

६. सभासद :

क्रियाशील सभासद : दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर एकूण १८,५१० इतके सभासद होते. यामध्ये अहवाल वर्षात ६८५ नवीन सभासद झाले. ८२८ सभासद सेवानिवृत्ती, मृत्यू इत्यादी कारणाने कमी झाले असून दिनांक ३१ मार्च, २०२६ अखेर सभासद संख्या १८,३६७ इतकी आहे.

७. भाग भांडवल :

अधिकृत भाग भांडवल रु. १०० कोटी आहे. ३१ मार्च २०२६ अखेर वसुल भाग भांडवल रु. २६,१७,८०,०००/- इतके आहे.

८. वैधानिक राखीव निधी :

३१ मार्च २०२५ अखेर वैधानिक राखीव निधी रु. ३०,५२,६३,९२३/- इतका होता. त्यामध्ये अहवाल वर्षात गतवर्षीच्या नफा विभागणीतून रु. १,५६,००,६९०/- जमा झाले. रु. ६८,५००/- प्रवेश शुल्क व रु. ४,२२,८२६/- न घेतलेला सन २०२१-२०२२ चा लाभांश असे मिळून ३१ मार्च २०२६ अखेर वैधानिक राखीव निधी रु. ३२,१३,५५,९३९/- इतका झाला आहे.

९. स्वनिधी :

आर्थिक सदृढतेचे परिणाम असलेला घटक म्हणून संस्थेचा स्वनिधी उत्तरोत्तर वाढत राहणे ही संस्थेच्या स्थैर्यासाठी आवश्यक आहे. गतवर्षी संस्थेचा स्वनिधी एकूण रु. १२३,४०,५९,५६६/- इतका होता. अहवाल वर्षात संस्थेच्या स्वनिधीमध्ये ५.६८% म्हणजेच रु. ७,०२,१०,४७६/- कोटींची वाढ होऊन दि ३१.०३.२०२६ अखेर स्वनिधी रु. १३०,४२,७०,०४२/- इतका झाला आहे.

१०. बँकेतील गुंतवणूक :

अहवाल सालात संस्थेकडे उपलब्ध झालेला निधी अधिकाधिक परतावा मिळणाऱ्या व शासन निकषांची पूर्तता करणाऱ्या बँकांच्या मुदत ठेवीमध्ये रु. ५०,६७,६०,३०८/- इतकी रक्कम स्टॅट्यूटरी लिक्वीडिटी फंड मध्ये गुंतवणूक केली आहे.

त्याचप्रमाणे मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये राखीव निधी रु. ३२,१८,५७,२३३/- इतकी गुंतवणूक केली असून अहवाल साली या गुंतवणूकीवर संस्थेस रु. २,८५,०४,५१०/- इतका व्याजाचा लाभ मिळाला आहे.

११. सभासद ठेवी :

आपली पतसंस्था आणि सभासद यांच्यातील विश्वास कायम राहणेसाठी कटीबद्ध असणे हे सर्व संचालक व कर्मचारी यांचे आद्य कर्तव्य आहे. त्याच दृष्टीकोनातून संस्थेची वाटचाल चालू आहे. संस्थेकडे विविध प्रकारच्या आकर्षक ठेव योजना आहेत. या योजनांमध्ये दर वर्षीप्रमाणे सभासदांकडून अहवाल वर्षातही ठेवी ठेवण्यास चांगला प्रतीसाद मिळाला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

१ एप्रिल, २०२५ रोजी प्रारंभिक शिल्लक	रु.	५०४,३७,९५,७६४.००
अहवाल वर्षात जमा झालेल्या ठेवी	रु.	२८३,५७,४२,३१५.००
अहवाल वर्षात परत केलेल्या ठेवी	रु.	२६२,३१,९८,४६४.००
३१ मार्च २०२६ अखेरच्या शिल्लक ठेवी	**रु.**	**५२५,६३,३९,६१५.००**

१२. सभासद कर्जे :

सभासदांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन आपल्या पतसंस्थेने माफक व्याजदराने कर्ज पुरवठा केला आहे. सभासदांनी घेतलेल्या कर्जाची थकबाकी होऊ नये यासाठी प्रत्येक कर्जदार सभासदाने जबाबदारी स्वीकारली पाहिजेत. दरवर्षीप्रमाणे सभासदांकडून अहवाल वर्षातही कर्ज उचल करण्यास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

१ एप्रिल, २०२५ रोजी प्रारंभिक शिल्लक	रु.	१००४,७२,४९,७८२.००
अहवाल वर्षात कर्ज वाटप	रु.	७४४,५३,६०,५५५.००
अहवाल वर्षात वसुल झालेले कर्ज	रु.	६२४,४०,१४,०५५.००
३१ मार्च २०२६ अखेरचे शिल्लक कर्ज	**रु.**	**११२४,८५,९६,२८२.००**

अहवाल सालात कर्जामध्ये गतवर्षीच्या तुलनेत रु.१२०.१३ कोटींची वाढ झाली आहे. कर्ज वृद्धीचा दर ११.९५% इतका आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६१ कलम ७५(२) नुसार संचालक आणि त्यांच्या नातलगांना दिलेल्या कर्जाचा तपशील:-

अ. क्र.	तपशील	३१/०३/२०२५ अखेर येणे कर्ज रुपये	वर्षभरात मंजूर रक्कम रू.	वर्षभरात वसूल रक्कम रू.	३१/०३/२०२६ अखेर येणे कर्ज रुपये	३१/०३/२०२५ अखेर थकबाकी
१.	संचालक	३,२६,२३,८०४	२,६५,४९,०००	२,८६,५७,४६८	३,०५,१५,३३६	नाही
२.	नातलग	-	-	-	-	नाही
	एकूण	**३,२६,२३,८०४**	**२,६५,४९,०००**	**२,८६,५७,४६८**	**३,०५,१५,३३६**	**नाही**

१३. कर्ज थकबाकी :

दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर सभासदांना वाटप करण्यात आलेल्या एकूण कर्जाची येणे बाकी रु.११२४,८५,९६,२८२/- इतकी असून संबधीत कर्जापैकी एकूण थकबाकी रु. १,९५,५७,०७६/- इतकी आहे. थकबाकीचे एकूण येणे कर्जाशी प्रमाण ०.१७% इतके आहे. सदरची थकबाकी दिसत असली तरी कर्जाची वसुली चालू आहे.

१४. अनुत्पादित कर्जे (एन.पी.ए.) व्यवस्थापन :

संस्थेने कर्जे वसुलीबाबत प्रभावी व्यवस्थापन केल्याने अनुत्पादित कर्जे (एन.पी.ए.) नियंत्रणात ठेवली आहेत, मार्च २०२६ अखेर संस्थेचे केवळ अनुत्पादित कर्जाचे (Gross NPA) प्रमाण ०.७२% असुन निव्वळ अनुत्पादित कर्जाचे (Net NPA) प्रमाण ०.२२% इतके आहे.

१५. संड्री खाते :

दिनांक ३१ मार्च, २०२५ अखेर संड्री खात्यात रु. ३,३१,०५,६५५/- इतकी रक्कम शिल्लक होती. अहवालसाली संड्री खात्यामधून रु. १,०६,९६,३०१/-इतकी रक्कम संबंधित सभासदांना वाटप करण्यात आली. दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर संड्री खात्यात रु. २,२४,०९,३५४/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

१६. मृत्यू सहाय्य निधी :

अहवाल वर्षात या निधीतून ३७ मृत सभासदांच्या वारसांना (सन २०२५-२६ मधील ३६ सभासद आणि मागील वर्षामधील १ सभासद) रु. १५,०००/- × ३६ व १०,०००/- ×१ (सन २०१८-१९ मधील), असे एकूण रक्कम रु. ५,५०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात आले.

१७. श्रद्धांजली :

अहवाल सालात संस्थेचे सभासद, शास्त्रज्ञ, डॉक्टर,नर्सेस, साहित्यिक, सुरक्षा दलातील जवान व सामान्य नागरिक दिवगंत झाले आहेत. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी यासाठी संस्थेच्या वतीने "भावपूर्ण श्रद्धांजली" अर्पण करीत आहोत.

१८. मुंबई बँक कर्ज :

अ) कॅश क्रेडिट कर्ज सुविधा : आमच्या पतसंस्थेस दि. ०१.०१.२०२७ अखेरच्या मुदतीने मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रु. ५०७,०९,५७,०००/- इतकी कॅश क्रेडिट कर्ज सुविधा मंजूर केली आहे. सभासदांच्या आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मंजूर केलेल्या कॅश क्रेडिट कर्ज रक्कमेपैकी रु. ४४३,१२,३७,४५९/- इतकी रक्कम अहवालसाली उचल करण्यात आली.

ब) मुदत कर्ज (Term Loan) : मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आमच्या पतसंस्थेस दि. १८.१२.२०२४ रोजी परतफेडीच्या ८४ समान मासिक हप्त्याने रु. १०० कोटी कर्ज मंजुर केले.

मुंबई बँकेने आमच्या पतसंस्थेची कर्जाची परत फेडीची क्षमता लक्षात घेऊन मुदत कर्ज मंजुर केले. या मुदत कर्जाच्या सुविधेची संचालक मंडळाने सभासदांच्या आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी स्वीकृती केली. दि. ३१ मार्च २०२६ अखेर मंजूर मुदत कर्ज (Term Loan) पैकी रु. ९९,९०,६१,०३८/- इतकी रक्कम उचल करुन अहवाल वर्षात एकूण रु. १३,५८,३६,४८१/- इतकी कर्जाची परतफेड करण्यात आली. दि ३१ मार्च २०२६ अखेर रु. ८६,३२,२४,५५७/- इतके कर्ज शिल्लक आहे.

मुंबई बँकेने या उपलब्ध करून दिलेल्या सुविधेबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

१९. सभासद आपुलकी निधी योजना :

संस्थेकडे ३१ मार्च, २०२६ पर्यत अहवाल वर्षात सदरच्या योजनेत सामील असलेल्या एकूण सभासदांपैकी ३५ सभासद मृत झाल्याची नोंद झाली, यापैकी अहवाल सालात २० मयत सभासद अधिक मागील वर्षातील देय असलेले १५ मयत सभासद अशा एकूण ३५ मयत सभासदांच्या कायदेशीर वारसास सभासद आपुलकी निधी अंतर्गत प्राप्त झालेल्या वर्गणीतून प्रत्येकी रु. १ लाखांची मदत देण्यात आली.

या योजनेचा तपशील पुढीलप्रमाणे :

१ एप्रिल, २०२५ रोजीची शिल्लक निधी	रु.	९,४३,०७८.००
अहवाल साली वर्गणीद्वारे जमा झालेला निधी	रु.	४३,५३,६४२.००
सदर योजनेतून गतवर्षीच्या दिवगंत सभासदांच्या वारसास आर्थिक मदत	रु.	१५,००,०००.००
अहवाल सालातील दिवगंत सभासदांच्या वारसास आर्थिक मदत	रु.	२०,००,०००.००
३१ मार्च २०२६ अखेरचे शिल्लक असलेली रक्क्म	**रु.**	**१७,९६,७२०.००**

खालील सभासदांच्या वारसांस रु. एक लाखाची मदत आपुलकी निधी योजनेअंतर्गत देण्यात आली

अ.क्र.	सभासद क्रमांक	संगणक क्रमांक	दिवंगत सभासदाचे नांव	मृत्यू दिनांक
१.	४६४१७	HK//1659	श्री शक्ती सिंग राठोर	१६.०१.२०२५
२.	४१२२४	NG/624/0002	श्री मुथू शंकरलिंगम पंडाराम	१४.०३.२०२५
